ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भविष्यकालीन शिक्षक – शिक्षणातील आव्हाने.

**प्रा.सौ.शेख फहीमा अकील**
*शरदचंद्रजी पवार बी.एड कॉलेज कोरेगाव भिमा.*

**Abstract**

*राष्ट्राचा दर्जा लोकांना दिल्या जाणाऱ्या शिक्षकांच्या गुणवत्तेवर अवलंबुन असतो. शिक्षणाची गुणवत्ता शिक्षकांच्या गुणवत्तेवर अवलंबुन असते. तर शिक्षकांची गुणवत्ता हि शिक्षक – शिक्षण कार्यक्रमाच्या गुणवत्तेवर अवलंबुन असते. त्यासाठी भविष्यकालीन शिक्षक – शिक्षणात वेळ, काळ, स्थान, परिस्थिती यानुसार महत्वाचे बदल होणे आवश्यक ठरते. त्यात अध्यापन संस्कृती, अधुनिक पध्द्ती, व तंत्राचा वापर, गरजाधिष्टीत अभ्यासक्रम उदबोधन वर्गाचे आयोजन, नवीन कल्पना, सामाजिक संपर्क जीवनाभिमूखता इ. गोष्टींचा विचार करुन शिक्षक – शिक्षण कार्यक्रमाची आखणी करणे आवश्यक ठरते. तसेच दोन वर्षाच्या नवीन बी.एड अभ्यासक्रमात वरील मुदद्यांना पुरेसा वेळ देऊन त्यांची अंमलबजांवनी करुन खऱ्या अर्थाने शिक्षक घडविले जातील व शिक्षक – शिक्षणाची गुणवत्ता वाढेल.*

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

## Tofler :-

" The future doesn't just happen, we make it and we can use it"

S.M. Ram :-

"The Future doesn't exist. It is Created"

बदल हा निसर्गाचा नियम आहे. स्थितीशील असे काहीच नाही. शिक्षकांना शिक्षण देणाऱ्या शिक्षणाचा भविष्यात डोकावुन विचार करणेच आवश्यक ठरते म्हणूनच –

**Charles F Kettering म्हणतात :–**

" I am not interested in the past, I am interested only in the future for there is where I expect to spend the rest of my life"

राष्ट्राचा दर्जा लोकांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबुन असतो. शिक्षणाची गुणवत्ता शिक्षकांच्या गुणवत्तेनुसार अवलंबुन

असते.शिक्षणाची गुणवत्ता शिक्षकाची गुणवत्ता हि शिक्षक – शिक्षण कार्यक्रमाच्या गुणवत्तेवर अवलंबुन असते.

**कोठारी आयोग :– " The destiny of the nation is being shaped in her classes "**

तेव्हा वर्गात राष्ट्राचे भवितव्य घडविणाऱ्या शिक्षकांसाठी भविष्यकाळासाठी शिक्षक – शिक्षण हे अत्युच्च पातळीवरचे असणे आवश्यक ठरते. त्यासाठी पुढील गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील :–

**१) अध्यापन संस्कृती आणि शैक्षणिक बदल :–**

अध्यापन संस्कृतीचा संबंध सामाजिक आणि तार्किक मूल्यांशी असतो. यामध्ये वर्तनबदल Modification of Behavior मानवी गुणांचा विकास आणि सामाजीक व आदर्शवादी प्रमाणकांची योग्य दिशेने समृध्दी यांचा सामावेश होतो म्हणजेच,

'' छात्राध्यपकांस सुसंस्कृत बनविण्यासाठी व त्यांनी विद्यार्थ्यांना सुसंस्कृत बनविण्याच्या क्षमता त्यांच्यात विकसीत करण्यासाठी शिक्षक – शिक्षणाच्या आराखडयात महत्वाचा घटक म्हणजे अध्यापन संस्कृती होय''

नवीन दोन वर्षाच्या शिक्षक – शिक्षणाकडुन भविष्यात शिक्षक – शिक्षणााठी हेच अभिप्रेत आहे.

**२) काळानुरुप योग्य पध्द्तींचा तंत्राचा वापर :–**

महिती संप्रेषन तंत्रज्ञान (I.C.T), L.C.D, O.H.P,Project, Studu-tour,Heuristic , Team – Teaching, Seminar, Work Shop, Group Discussion अशा पध्द्तींचा वापर करुन प्रशिक्षणार्थींना स्वयंअध्ययनास प्रेरीत केले पाहिजे. तसेच Obeservation, Projective technique तंत्राचा वापर करणे आवश्यक ठरते.

**३) बदलत्या गरजांनुसार अभ्यासक्रमाची आखणी :–**

आजची युग हे इंटरनेटचे युग आहे. भविष्यात यापेक्षाही गतिमान तंत्रज्ञान विकसीत होईल त्याचा विचार करुन अभ्यासक्रमाची आखणी करणे आवश्यक ठरते.

**४) निकोप आंतरक्रिया वृध्द्गिंत करणे :–**

निरनिराळया क्षेत्रातील व्यक्ती, संस्था,कार्यवाही यांच्याशी शिक्षक – शिक्षण कार्यक्रमात अडचणी कळतील, त्यावर उपाय शोधता येतील त्यानुसार प्रशिक्षणार्थींना घडविता येईल. त्याचा उपयोग शिक्षक – शिक्षणाचे कार्यक्रम विकासाभिमुख करण्यासाठी होईल.

युनेस्को UNESCO ने सांगितल्याप्रमाणे ' Learning webs, Learning to be' या कल्पना दोन वर्षाच्या अभ्यासक्रमात करता येतील.

**५) उद्‌बोधन वर्गाचे आयोजन ''**

दोन वर्षाच्या नवीन बी.एड अभ्यासक्रम बदलाविषयी जीवनातील भविष्यकालीन शिक्षक – शिक्षण बदलासाठी आवश्यक शैक्षणिक बाबी, नवप्रवर्तने इ. योग्य प्रकारे राबविण्यासाठी वेळो वेळी उदबोधन वर्गाचे आयोजन करावे. तज्ञांचे मार्गदर्शन व प्रात्यक्षिक दाखविले जावीत. त्यातुनच शिक्षक शिक्षणाने असे शिक्षक बनविले पाहिजेत की जे भविष्यातील शाळांमध्ये यशस्वीपणे काम करु शकतील.

**६) नविन कल्पनांचा स्विकार :–**

सहभागातील वधिष्णू, बदलत्या अध्ययन जाळयांचा विकास करावा, व्यवस्थापनाच्या विविध कल्पना, शिक्षणाचे लोकशहीकरण, आजीवण शिक्षण, समवाय, प्रभुत्व अध्ययन, तसेच UNESCO च्या आंतरराष्ट्रीय आयोगाच्या अहवालात सांगितलेल्या शिक्षणाचे चार स्तंभ :–

- Learning to Know
- Learning to do
- Learning to live together
- Learning to be

अभ्यासयुक्त अध्यापन, अध्यापन शास्त्र Pedagogy यासारखा भविष्यात सर्वांना उपयोगी ठरणाऱ्या कल्पनांचा विचार शिक्षक – शिक्षणासाछी केला पाहिजे.समाजातील अज्ञान, अंधश्रध्द्‌ समस्या दुर करुन लोकांच्या मनात सामाजीक जाणीवा निर्माण करुन समाजाचा विकास करण्याची जबाबदारी शिक्षकावर असते.

**उदा :– स्वच्छता अभियान :–**

समाजसेवा,ग्रामीण विकास व वेगवेगळया घटकांपर्यंत जाऊन सामाजिक संपर्क वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करता येतील.

**८)शिक्षक – शिक्षण संस्थांची सुसज्जता :–**

दोन वर्षांच्या नवीन बी.एड अभ्यासक्रमात प्रशिक्षणार्थीच्या संख्येनुसार भौतीक,आर्थीक,मानवी या सर्व दृष्टीन शिक्षक – शिक्षण संस्था सुरु असल्या पाहीजेत.पुरेशी सुसज्ज इमारत, शैक्षणिक साधने, संगणक, इंटरनेट, ई – लर्नींग, एज्युसेट यांसारख्या आत्याधुनिक सोयी प्रशिक्षणार्थींना उपलब्ध करुन देणे उपयुक्त ठरते.

**९) जीवनाभिमुखता :–**

जीवणात उपयुक्त ठरणाऱ्या विषयाचा शिक्षणात सामावेश असावा म्हणुन शिक्षक – शिक्षण कार्यक्रम आखतान जे जीवणाभिमुख होईल त्याचा विचार करावा.

उदा :– योगा, नैतीक शिक्षण, आजिवण शिक्षण, ग्रामिण विकास, व्यवसायाभिमुख शिक्षण, समाजोपयोगी उत्पादन कार्य, कार्य शिक्षण इ कालानुरुप व स्थानीक परिस्थितीनुसार योग्य ते विषय अभ्यासक्रमात ठेवावे.

**उदा :– पापड,लोणचे, जात, जेली,रेशमी किडयांची पैदास इ.**

**१०) शालेय अनुभुती कार्यक्रम :–**

शिक्षक – शिक्षणात शैक्षणिक अनुभव हा महत्वाचा घटक आहे. तो गांभिर्याने, प्रामाणिकपणे, दक्षतेने पार पाडले पाहीजे. शैक्षणिक अनुभुतींसाठी भरपुर वेळ दोन वर्षांच्या बी.एड अभ्यासक्रमावर मात देण्यावर भर दिला पाहिजे. म्हणून शाळेत फक्त पाठ संपल्यावर भर न देता प्रशिक्षणार्थींना शाळेतील सर्व अनुभूती मिळाव्या या दृष्टीने कार्यक्रमाची आखणी केली पाहीजे.

**११) प्रशिक्षणार्थी केंद्रीत शिक्षक – शिक्षण :–**

वरिल सर्व गोष्टींचा विचार करता, भविष्यकालीन शिक्षक – शिक्षण योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी सर्वात महत्वाचा घटक म्हणजे प्रशिक्षणार्थी हा होय.

म्हणून शिक्षक – प्रशिक्षणांचे कार्यक्रम ही प्रशिक्षणार्थी केंद्रीत असावेत.

त्यासाठी स्वयंअययन, सर्वेक्षण, क्षेत्रीय काम प्रात्यक्षिक इ उपक्रम राबवावे.

तसेच अभ्यासक्रमात तात्वीक विषयाचे अधिकाअधिक ऐच्छिक पेपर ठेवुन त्यांच्या आवडीला अभिवृत्तीला स्थान देता येईल. तसेच प्रशिक्षणार्थीची आवड,कुवत, अभिरुची,नवीन उपक्रम त्यांना अवगत असलेल्या कला यांचा विकास करण्यावर भर घ्यावा. व नवनविन उपक्रमात त्यांना सहभागी करुन घ्यावे.

अशा प्रकारे वरील मुदद्यांच्या विचार करुन भविष्यातील शिक्षक – शिक्षणाची तयारी करावी. भविष्यातील जबाबदाऱ्या पेलणारे शिक्षक तयार करण्याचे सामर्थ्य शिक्षक शिक्षणात असावेत.

याबाबत Toffer च्या मते :–

" Student must be sensitized to the trends of change, to probabilities , for alternative future, to an array of future possibilities, to modes of adoption, to corrective and innovative action"

मोठे वर्ग, बहुजिनसी वर्ग यासारख्या समस्यांवर मात करणारे, सविंधानात्मक मानवी मूल्ये जोपासणारे, समाजाचे भग्यविधाते,उत्तरदायीत्वाभिमूख असे शिक्षक – शिक्षणातुन भविष्यात तयार झाले पाहिजेत.

तसेच उच्च बुध्दि्मत्ता, क्षमता असणारे विद्यार्थी शिक्षक – शिक्षण घेण्यासाठी यावेत म्हणून शासनाने, संस्थाचालकांनी मोठया पगाराचे पॅकेजेस (आयटी कंपन्यांप्रमाणे) दयावीत. तसेच बुध्दि्मान नवनिर्मिती क्षमता असणारे शिक्षक तयार होतील व त्यांच्याकडुन त्यांच्या विद्यार्थ्यांच्या रुपाने उदयोजक

निर्माण होतील त्यासाठी प्रशिक्षणार्थींना सखोल अनुभव घेऊन प्रथम चांगला मानुस घडण्यासाठी वेगवेगळया इतर ही कार्यक्रमांची माहिती घ्यावी.

**उदा :— १) T.V वरील स्टार प्लस चा कार्यक्रम '' आज की रात है जिंदगी ''**

यातुन साकाजिक कार्याची वेगळी पध्द्त समजेल.

२) Epic Channel वरील Epic Grams, Epic के दस यांसरखे कार्यक्रम रेकॉर्ड करुन वर्गात दाखवावे.त्यातुन अनेक वस्तुंचा शोध, त्यांचा उगम, जगभरातुन त्यांचा प्रवास, उत्पादन त्यांचाप्रवास उत्पादन इ विषयी माहिती प्रशिक्षणार्थींना मिळेल व त्यांचा उपयोग त्यांची आवड वाढेल. व उत्कृष्ठ प्रतिकृति, प्रकल्प तयार करण्यास त्याची मदत होईल.

खऱ्या अर्थाने शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता वाढेल. उस्मानाबाद येथील जिल्हा परीषदेच्या तसेच नाशिक जिल्हयात ५२७ शाळा पूर्णपणे डिजीटल करण्यात आल्या. त्यांचा वापर करण्यासाठी शिक्षकांनाही त्यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. भविष्यातील हे बदल (E- Learning) लक्षात घेवुनच शिक्षक — शिक्षण अभ्यासक्रमात त्याचा उपयोग करावा कारण वेळेवर नुसत प्रशिक्षण देंऊन हे कार्य परिपूर्ण होत नाही.

तसेच शिक्षक — शिक्षणाचा अभ्यासक्रम, आकर्षक करावा त्यामुळे विद्यार्थी याकडे आकर्षित होतील. त्यासाठी N.C.E.R.T, N.C.T.E, U.G.C. यांच्याशी समन्वय साधून शिक्षक — शिक्षणाचा अभ्यासक्रम ठरवावा.

**संदर्भ :—**

*पारसनिस न. रा. (मार्च २००८) शिक्षकांचे प्रशिक्षण पुणे, नित्य नुतन प्रकाशन.*

*पंडीत. बी.बी. (जुन २००९) शिक्षक — शिक्षण नागपुर, पिंपळापुरे अॅण्ड कं पब्लिशर्स.*

*कुंडले म. बा. (१९९०) शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे, श्री विद्या प्रकाशन.*

*जगताप ह.ना. (२००७) शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने पुणे नुतन प्रकाशन.*

*भिलेगावकरे एस.डी. (२००८) शिक्षक कशक्षण पुणे नित्य नुतन प्रकाशन.*

*Aagarwal J.C (2003) Educational Technology and management, Agra, Vinod Pustak Mandir*

*Ram S (1999) Current Issues in Teacher Education New Delhi, Sarup & Sons.*

*Ruhela S. (ed)(2000) Futurology of Education, New Delhi, Kanishka Publishers Distributors.*